सरकारतर्फे साक्षीदार क्र.३ चा सरतपासः-
मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,
माझे नावः - कडुभाऊ यादव सोनवणे,
वय - ६५ वर्षे, व्यवसाय- शेती,
राहणार - हिंगोणी, ता. नेवासा, जि. अहमदनगर.

अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.पी. औताडे यांचे मार्फत सुरुः-

पोलिसांनी मला पोलिस स्टेशनला बोलावले होते. तिथे पोलिसांनी माझी एका कागदावर सही घेतली. माझी सही मला दाखवल्यास मी ओळखु शकतो. आता मला जप्ती कम घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला त्यावर अनुक्रमांक १ ला माझी सही आहे, त्यातील मजकुराबाबत मला माहिती नाही. सहीस निशाणी ३२ देण्यात येते.

साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याकारणाने अभियोग पक्षातर्फे भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार प्रश्न विचारण्याची परवानगी मागणेत आली. वस्तुस्थितीची पाहणी करता व साक्षीदाराचे विसंगत विधान बघता सदर परवानगी देणेत आली.

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. २१/०२/२०२२ रोजी घटनास्थळ व जप्ती पंचनामा करण्यासाठी पोलिसांनी मला हिंगोणी गावाच्या शिवारात दादासाहेब सोनवणे यांच्या रहात्या वस्तीवर बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटना ठिकाण दादासाहेब सोनवणे यांनी दाखवले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटना ठिकाण दादासाहेब सोनवणे यांच्या रहात्या वस्ती समोरील पटांगणामध्ये होते. हे म्हणणे खरे नाही की, घटना ठिकाणावरून पोलिसांनी माझे समक्ष दोन फुट लांबीचा एक से.मी. व्यासाचा एक गज जप्त केला. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्या समक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला व तो मला वाचुन दाखवला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचवण्यासाठी आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास आरोपीतर्फे ॲड. पी.डी.गर्जे यांनी नाकारला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

सही/-
(ए.एन.सरक)
दिनांक-१४/०७/२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.३), नेवासा